महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे   Rs.2/-   कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖ १८ मे २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक ३१९ ❖ पाने - ४   ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पत्रकार हवे आहेत**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

# उल्हासनदी कायमची जलपर्णीमुक्त होणार कधी?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : २६जुलै२००५चा महापूर असो, अथवा२०१८-१९,किंवा आता अलीकडच्या काळातील कल्याण तालुक्यात आलेला पूर असो, प्रत्येक वेळी आपला जीव धोक्यात घालून पाण्यात अडकलेल्या नागरिकांना, आपल्या होडीतून सुखरूपपणे किनारी पोहचवणा-या स्थानिक मच्छिमारावर मात्र आता जलपर्णी मुळे उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे शासन याकडे लक्ष देणार आहे का?तसेच उल्हास नदी कायमस्वरूपी जलपर्णी मुक्त कधी होणार?असा प्रश्न यांनी उपस्थित केला आहे.





कल्याण तालुक्याची जीवनवाहिनी असलेली उल्हास नदीने अनेकांचे संसार उभे केले आहेत, त्यामध्ये या परिसरातील कोळी-आगरी बांधवाचा सहभाग आहे, या नदीचे मासे अंत्यत चवदार, वेगवेगळया प्रकारचे, जातीचे ताजे मासे असल्याने त्यांना मोठी मागणी असते, उल्हासनगर, कल्याण, टिटवाळा, अंबरनाथ, बदलापूर अशी मोठी शहरे जवळ असल्याने माशांना बाजारभाव देखील चांगला मिळतो, त्यामुळे नदी काठचे अनेक कोळी बांधव होड्याच्या मदतीने या नदीत मासेमारी करतात,

परंतु गेल्या काही वर्षांपासून सांडपाणी, व इतर कारणामुळे उल्हास नदी मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाली आहे, यामुळे नदी पात्र जलपर्णीमुळे भरले होते, या विरोधात काही संघटनांनी उपोषण, अंदोलन केले, तसेच पत्रकार संजय कांबळे यांनी हा विषय लावून धरल्याने प्रदूषण नियंत्रण मंडळाने ही जलपर्णीनी काढण्यासाठी २मशीन पाठवल्या, यांनी काही दिवस जलपर्णी काढलीही? म्हारळ, वरप, कांबा, या परिसरातील नदी पात्र जलपर्णीनी मुक्त झाले, परंतु पुढे, कांबा, मोहिली, रायते, आपटी बंधारा येथील जलपर्णी खाली वाहून येवू लागल्याने या मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवाची जाळी अडकून फाटू लागली, शिवाय पाण्यातून वाहून जाण्याचे प्रकार घडू लागले, पुराच्या वेळी अनेकांच्या होड्या वाहून गेल्या, तरीही यांना नदी काठाची, पात्राची इंथभूत माहिती असल्याने जेंव्हा पण नैसर्गिक आपत्ती, किंवा पुर परिस्थिती निर्माण होते तेंव्हा नागरिकांचे जीव वाचवण्यासाठी हे कोळी बांधव मदतीसाठी धाऊन येतात, इतकेच नव्हे तर एकाद्याचा मृतदेह भेटत नसेल तेंव्हा यांनाच पाचारण केले जाते.संपूर्ण या परिसरात असे२०/३०होडी वाले आहेत, असे असताना आता जलपर्णी मुळे ते संकटात सापडले आहेत, थोडे नदीपात्र जलपर्णी मुक्त झाले असल्याने हे लोक पांरपारीक पध्दतीने मासेमारी करत होते, परंतु आता परत वरील जलपर्णी खाली वाहत येत असल्याने, व जलपर्णी काढण्याचे काम थांबल्याने त्यांच्या मासेमारी व्यवसायावर संकट आले आहे, अशातच एक मशीन देखील परत गेली आहे, त्यामुळे उल्हासनदी जलपर्णी मुक्त कधी होणार?शासन आमचा काय विचार करणार आहे का?असा प्रश्न येथील रोहिदास पाटील, आणि राकेश तरे या कोळी बांधवानी उपस्थित केला आहे.

# जीएसटीच्या वर्धापन दिनानिमित्त सायक्लोथॉन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) प्रणालीच्या आठव्या वर्षपूर्तीनिमित्त जीएसटी दिन साजरा करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने बेलापूर येथील केंद्रीय वस्तू आणि सेवा कर व केंद्रीय उत्पादन शुल्क आयुक्तालयातर्फे रविवारी (ता. १८) सकाळी ६ वाजता सीबीडी बेलापूरमध्ये भव्य सायक्लोथॉन / सायकल मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम



फिट इंडिया मुव्हमेंटच्या समन्वयाने राबविण्यात येत आहे. सायक्लोथॉनमध्ये बेलापूर परिसरातील नागरिक तसेच नवी मुंबई, रायगड व लेखापरीक्षण आयुक्तालयातील अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. या सायक्लोथॉनमध्ये सहभागी होणारे सर्व जण डीजीटीएस मार्गदर्शक तत्त्वांनुसार डिझाइन केलेले एकसमान जर्सी परिधान करणार आहेत. सायक्लोथॉनचा मार्ग ३.५ किमीचा असून, बेलापूर सेक्टर १० ते सेक्टर १५ या भागांमध्ये मार्ग निश्चित करण्यात आला आहे. या मार्गामध्ये विविध ठिकाणी रिफ्रेशमेंट ड्रिंक्सची सोय करण्यात आली आहे. या सायक्लोथॉनची सुरुवात बेलापूर येथील सीजीएसटी व केंद्रीय उत्पादन शुल्क आयुक्तांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात येणार आहे. या सायक्लोथॉनच्या मार्गावर डीजीटीएसच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार बॅनर्स, स्टेंडीज व माहिती केंद्रे (किऑस्क) लावण्यात येणार आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून जीएसटीबाबत जनजागृती, कर पद्धतीतील पारदर्शकता, व्यवसाय सुलभता व देशाच्या आर्थिक वृद्धीस चालना देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

# कल्याणमधील टाटा कौशल्यवर्धन केंद्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन

## खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने केंद्राची उभारणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण शहरातील दावडी येथे टाटा टेक्नॉलॉजी लिमिटेड संचलीत कौशल्यवर्धन केंद्र, सेंटर फॉर इन्व्हेंशन इनोव्होवेशन, इक्युबेशन अँड ट्रेनिंग सेंटरची उभारणी करण्यात येत आहे. कल्याण लोकसभा खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने व पाठपुराव्याने तसेच उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या सहकार्याने सुमारे १९७ कोटी रुपयांच्या निधीतून हे केंद्र उभे राहणार आहे. टाटा टेक्नॉलॉजीज, इतर उद्योग संघ, एमआयडीसी व कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचा हा संयुक्त उपक्रम आहे. यामाध्यमातून दरवर्षी अंदाजे ७००० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे. केंद्राच्या माध्यमातून अत्याधुनिक प्रशिक्षण मिळाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रविवार १८ मे रोजी डोंबिवली पूर्वेतील सावळाराम महाराज क्रीडा संकुलाच्या मैदानात सायंकाळी ४.३० वाजता या प्रकल्पाचे भूमिपूजन संपन्न होणार आहे.


कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे हे टाटा सारख्या अनेक कंपन्या मतदारसंघात याव्यात आणि येथील भूमिपुत्रांना जिल्ह्यातच रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतात. याच पार्श्वभूमीवर टाटा समवेत कल्याण येथील दावडी येथे कौशल्यवर्धन केंद्र उभारण्याचे नियोजन करण्यात आले होते. यासाठी टाटा संस्थेसमवेत करार देखील करण्यात आला आहे. या केंद्रासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत १ एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तर २१ हज़ार ५०० स्क्वेअर फुट या जागेवर केंद्राचे बांधकाम केले जाणार असून सुमारे या प्रकल्पासाठी एकूण खर्च १९७ कोटी इतका होणार आहे. तर येत्या सहा ते सात महिन्यात या केंद्राच्या उभारणीचे काम पूर्णत्वास जाणार आहे.

या केंद्रामुळे विद्यार्थ्यांना, उद्योग व्यावसायिकांना नवकल्पना आणि कौशल्य विकास याद्वारे उद्योगात कुशल संसाधने आणि उद्योजकता निर्माण करणे हे या केंद्राचे प्रमुख उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शिक्षणात गुणवत्ता सुधारणा करणे. तर कुशल मनुष्यवळाची वाढती गरज पूर्ण करण्यासाठी या सेंटरच्या माध्यमातून मनुष्यबळाला नैसर्गिक वातावरणात कौशल्य प्रशिक्षण देणे. या ठिकाणी उत्पादन क्षेत्रातील आवश्यक असलेले अभियंते, ऑपरेटर, तंत्रज्ञ आणि कुशल मनुष्यबळ यांना या ठिकाणी प्रशिक्षण मिळणार. या जिल्ह्यातील विद्यार्थी तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना सदर प्रकल्पाचा फायदा होणार असून, त्याद्वारे अत्याधुनिक प्रशिक्षण मिळाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे.

चांगल्या दर्जाच्या नोकरीची संधी वाढविण्यासाठी उच्चस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. नवोदित उद्योजकांना नवीन उत्पादन विकसित करण्यास मदत या ठिकाणी करण्यात येणार आहे. तसेच उद्योगामध्ये मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या अद्ययावत उत्पादन तंत्रज्ञान, साधने आणि उपकरण यांची सेंटर मार्फत स्थापना करण्यात येणार आहे.

# कोकण विभागात मुरबाड पोलीस स्टेशनला प्रथम मानांकन









## आ. किसन कथोरेंनी केले मुरबाड पोलिसांचे कौतुक!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात राबविलेल्या 100 दिवसांच्या कृती कार्यक्रमा अंतर्गत संपूर्ण कोकण विभागात प्रथम क्रमांक मुरबाड पोलीस स्टेशनला प्राप्त झाल्या बद्दल आमदार किसन कथोरे यांनी मुरबाड पोलीसांचे स्वतः पोलीस स्टेशनला येऊन विशेष अभिनंदन केले व त्यांनी केलेल्या उत्तम कामगिरीचे कौतुक केले.

तर मुरबाड पोलीस स्टेशन मध्ये नागरिकांसाठी उभारलेल्या कम्युनिटी हॉलचे उद्घाटन आमदार कथोरे यांच्या हस्ते आज करण्यात आली. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी जगदिश शिंदे , मुरबाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप गिते उपस्थित होते.

यावेळी आमदार कथोरे यांना पो.नि.गिते यांनी शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रमा अंतर्गत मुरबाड पोलीस स्टेशनने इमारतीचे अंतरंग व बाह्यरंगांनी केलेल्या सुशोभीकरणाची माहिती दिली. पोलीस स्टेशनमध्ये अभ्यंगतासाठी उभारलेल्या विशेष ग्रंथालय कक्षाची माहिती, पाण्याच्या सोयी, बाथरूम व्यवस्था व दर तिन मिनिटांनी होणारा विशेष सुगंधी स्प्रे, याज बरोबर मुरबाड पोलीसांनी राबविलेले विविध उपक्रम, पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हेगारी रोखण्यासाठी केलेल्या उपाय योजना ,उकल केलेल्या गुन्हांची माहिती लघुपटा द्वारे आमदार महोदयांना दाखविण्यात आली.या कार्यकालात दोन वेळा पोलीस स्टेशनची परीक्षकांनी तपासणी करून अहवाल पाठविण्यात आला होता.त्याला जास्त गुणांकन मिळाले असल्याने मुरबाड पोलीस स्टेशनचा प्रथम क्रमांक आला असल्याचे सांगितले.

मुरबाड पोलीस स्टेशनला हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल उपविभागीय पोलिस अधिकारी जगदिश शिंदे व पोलीस निरीक्षक संदीप गिते यांनी ठाणे ग्रामीणचे अधिक्षक डी.स्वामी,आमदार किसन कथोरे, मुरबाडचे पोलीस अधिकारी , कर्मचारी, पत्रकार, नागरिक यांचा सिंहाचा वाटा आहे.यासाठी सर्वांनी मेहनत घेऊन काम केल्यामुळे हे यश प्राप्त झाले असल्याचे त्यांनी म्हटले असून सर्वांचे आभार व्यक्त केले आहेत.

या उद्घाटनासाठी टिडीसी बँकेचे संचालक राजेश पाटील, उल्हास भाऊ बांगर, दिपक पवार, मोहन सासे, मुकेश विशे, जितेंद्र भावार्थे, संतोष गोंधळी, दिनेश उघडे, अविनाश पवार, मुकेश शेठ अग्रवाल, भाई तेलवणे, अतुल देशमुख, नरेश मोरे उपस्थित होते.









# गीतासार



## अध्याय ११
## विश्वरूपदर्शनयोगः

अमी हि त्वां सुरसङ्घा विशन्ति
केचिद्भीताः प्राञ्जलयो गृणन्ति ।
स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसङ्घाः
स्तुवन्ति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः
॥ ११-२१ ॥

तेच देवतांचे समुदाय आपल्यात शिरत आहेत आणि काही भयभीत होऊन हात जोडून आपल्या नावांचे व गुणांचे वर्णन करीत आहेत. तसेच महर्षी व सिद्ध यांचे समुदाय, सर्वांचे कल्याण होवो, अशी मंगलाशा करून उत्तमोत्तम स्तोत्रे म्हणून आपली स्तुती करीत आहेत. ॥ ११-२१ ॥

रुद्रादित्या वसवो ये च साध्या
विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च ।
गन्धर्वयक्षासुरसिद्धसङ्घा वीक्षन्ते त्वां
विस्मिताश्चैव सर्वे ॥ ११-२२ ॥

अकरा रुद्र, बारा आदित्य तसेच आठ वसू, साध्यगण, विश्वेदेव, दोन अश्विनीकुमार, मरुद्‌गण आणि पितरांचे समुदाय, तसेच गंधर्व, यक्ष, राक्षस आणि सिद्धांचे समुदाय आहेत, ते सर्वच चकित होऊन आपल्याकडे पाहात आहेत. ॥ ११-२२ ॥

रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं महाबाहो
बहुबाहूरुपादम् । बहूदरं बहुदंष्ट्राकरालं
दृष्ट्वा लोकाः प्रव्यथितास्तथाहम्
॥ ११-२३ ॥

हे महाबाहो, आपले अनेक तोंडे, अनेक डोळे, अनेक हात, मांड्या व पाय असलेले, अनेक पोटांचे आणि अनेक दाढांमुळे अतिशय भयंकर असे महान रूप पाहून सर्व लोक व्याकूळ होत आहेत. तसेच मीही व्याकूळ होत आहे. ॥ ११-२३ ॥

नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं व्यात्ताननं
दीप्तविशालनेत्रम् । दृष्ट्वा हि त्वां
प्रव्यथितान्तरात्मा धृतिं न विन्दामि
शमं च विष्णो ॥ ११-२४ ॥

कारण हे विष्णो, आकाशाला जाऊन भिडलेल्या, तेजस्वी, अनेक रंगांनी युक्त, पसरलेली तोंडे व तेजस्वी विशाल डोळे यांनी युक्त अशा आपल्याला पाहून भयभीत अंतःकरण झालेल्या माझे धैर्य व शांती नाहीशी झाली आहेत. ॥ ११-२४ ॥

दंष्ट्राकरालानि च ते मुखानि दृष्ट्वैव
कालानलसन्निभानि । दिशो न जाने
न लभे च शर्म प्रसीद देवेश जगन्निवास
॥ ११-२५ ॥

दाढांमुळे भयानक व प्रलयकाळच्या अग्नीसारखी प्रज्वलित आपली तोंडे पाहून मला दिशा कळेनाशा झाल्या असून माझे सुखही हरपले आहे. म्हणून हे देवाधिदेवा, हे जगन्निवासा, आपण प्रसन्न व्हा. ॥ ११-२५ ॥

## खाद्यसंस्कृती
### पालक पोहे वडे



साहित्य : पालक - 2 वाटी,पोहे - 1 वाटी साबुदाणा - 1/2 वाटी,हिरवी मिरची - 4 दही - 1 वाटी,कोथिंबीर - 1/2 वाटी खाण्याचा सोडा - चिमूटभर,मीठ - चवीनुसार

कृती : प्रथम साबुदाणा साधारण 7 ते 8 तास भिजत घालावा.पोहे 1 मिनिट पाण्यात भिजत ठेवावे.नंतर त्यातील संपूर्ण पाणी काढून १० मिनिटे झाकून ठेवा पालक बारीक चिरून घ्या.नंतर भिजलेल्या पोह्यात पालक, बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या, मीठ, खाण्याचा सोडा चिमूटभर, कोथिंबीर घाला.हाताला तेल लावून एकजीव करून घ्या.प्लास्टिक कागदावर वडे थापावून घ्यावे.गुलाबी होईपर्यंत तळून घ्या.आता तळलेले वडे प्लेट मध्ये काढून त्यावर दही घालावे.वरून कोथिंबीर टाकून सजावट करावी. आता वडे खाण्यास तयार आहेत.

# पूर्व प्राथमिक खाजगी शाळांसाठी नोंदणी अनिवार्य
## - शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांचे निर्देश



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : जिल्ह्यातील ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खाजगी शैक्षणिक संस्थांसाठी शालेय नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. ही नोंदणी राज्य शासनाच्या Pre-School Registration Portal (ECCE) वर करावी लागणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषद ठाणेचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी एका अधिकृत पत्राद्वारे दिली आहे.

पूर्व प्राथमिक शाळा, नर्सरी, जूनियर केजी, सीनियर केजी अशा कोणत्याही स्वरूपात शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांनी आपली नोंदणी education.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या Pre-School Registration टॅबवर करणे आवश्यक आहे.

नोंदणी करताना संस्थांनी पुढील माहिती व कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे:

१. शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेची प्रमाणपत्रे
२. इमारत पूर्णत्वाचा दाखला (Building Completion Certificate)
३. आरोग्य व स्वच्छता प्रमाणपत्र (Cleanliness Maintenance Certificate)

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अन्वये ३ ते ६ वयोगटातील मुलांना एकसंध व नियोजनबद्ध शिक्षण सुविधा देण्याच्या उद्देशाने ही कार्यवाही करण्यात येत आहे.

पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खाजगी शाळा व केंद्रांनी आपली नोंदणी अनिवार्यपणे पूर्ण करावी, अन्यथा नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी दिला आहे.

# परमेश्वर आपली परीक्षा का घेतो?



मनुष्य बऱ्याच वेळा आपल्या स्थितीला परमेश्वराला दोष देत असतो, त्याला असे वाटते की परमेश्वराच्या मनात असेल तर आपले जीवन बदलू शकते. आपल्या जीवनाची दोरी आपण परमेश्वराच्या हाती देऊन स्वतःला एक बाहुली समजत असतो. पण प्रत्यक्षात परमेश्वराशी असे नाते जोडणे योग्य आहे का? आपले नशिब घडण्यात आणि बिघडण्यात फक्त परमेश्वरच जबाबदार आहे का? याचा विचार आपण करायला हवा. मनुष्य जेव्हा संकटात असतो, तेव्हा तो वारंवार परमेश्वराकडे तक्रार करू लागतो, माझी परीक्षा घेऊ नको. पण खरोखर परमेश्वर तुमची परीक्षा घेत असतो का?

### खरोखर परमेश्वर तुमची परीक्षा घेतो का?

आध्यात्मिक गुरू सद्गुरू यासंदर्भात असे म्हणतात, जेव्हा भक्तावर एखादे संकट येते, तेव्हा भक्त स्वतःच असे म्हणतो, परमेश्वर त्याची परीक्षा घेत आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की परमेश्वर कोणाची परीक्षा घेत नाही, परमेश्वराला याची गरज नाही आणि मुख्य म्हणजे परमेश्वराकडे इतका वेळही नाही. परमेश्वराने तुम्हाला ओळखण्याची कोणतीच गरज नसते. कारण परमेश्वर तुम्हाला चांगल्या प्रकारे ओळखतो, त्या परमपित्या परमेश्वरापासून काहीही लपून राहिलेले नाही. परमेश्वराला आपली मनःस्थिती, बाह्यस्थिती, भूतकाळ, भविष्यकाळ आणि वर्तमान सर्व माहिती आहे. अशात परमेश्वराला आपली परीक्षा घेण्याची आवश्यकता का भासेल? याचा कधी विचार केला आहे का तुम्ही? परीक्षा अशा व्यक्तीची घेतली जाते, ज्याला आपण ओळखत नाही. जेव्हा भक्तांवर एखादे संकट येते तेव्हा ते त्याच्या कर्माचे फळ असते आणि ज्याला आपण परीक्षा समजतो.

### परमेश्वर तुमची परीक्षा कशी घेतो?

तर दुसरीकडे या संदर्भात प्रेमानंद महाराज यांचा दृष्टिकोन वेगळा आहे. प्रेमानंद महाराजांचे म्हणणे असे आहे, जीवनात चढउतार येऊ शकतात, त्यात तुम्ही कसे निर्णय घेता ही तुमची परीक्षा असते. जेव्हा तुम्ही परमेश्वराची भक्ती करता, तेव्हा तुमच्या मनात अनेक मोहमाया उत्पन्न होत असतात. मला हे मिळू दे, मला ते मिळू दे असे अशा अनेक मागण्या तुम्ही परमेश्वराकडे करता. तुमच्या मनातील सर्व सुप्त इच्छा बाहेर येतात, यामुळे तुमचे मन भक्तीपासून भटकते आणि त्या सुखांकडे आकर्षित होते. जेव्हा तुम्ही काही चांगले करत असता आणि तेव्हा जर तुमच्या आयुष्यात एखादं संकट आलं किंवा वाईट स्थिती उत्पन्न, तर अशावेळी परमेश्वरावरील आपला विश्वास डळमळू लागतो.

### तुम्ही स्वतः निर्णय घ्यावेत?

देव आपल्यालाच का संकटात टाकतो असे प्रश्न मनात उभे राहतात. आपल्याला वाटते परमेश्वर आपली परीक्षा घेत आहे. पण ते आपल्या जागृतीसाठी असते, आपल्या विकासासाठी असते. कारण परमेश्वराला तुम्हाला त्याच्या हातचे बाहुले बनवायचे नसते. परमेश्वराला उलट असे वाटत असते की तुम्ही स्वतः निर्णय घ्यावेत. तुमच्या मनात आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि पूर्ण विचाराने कर्मांची निवड तुम्ही करावी. स्वतःचे नशिब तुम्ही स्वतःच घडवावे. लक्षात ठेवा, तुम्ही तुमच्या कर्माने नशिबाचा निर्णय करत असता, आणि तुम्हाला असे वाटते की सर्व काही परमेश्वर करत आहे.

लेखिका
**अनिता किंदळेकर**

# रायगड जिल्ह्यात ड्रोन आणि अन्य हवाई उपकरणांवर बंदी
## - जिल्हाधिकाऱ्यांचा मनाई आदेश जारी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : भारत सरकारच्या 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत भारतीय लष्कराने पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर यशस्वी कारवाई केल्यानंतर, संभाव्य बदला घेण्याच्या दृष्टीने दहशतवादी संघटनांकडून ड्रोनचा वापर वाढल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून रायगड जिल्ह्यात १७ मे २०२५ ते ३ जून २०२५ या कालावधीत ड्रोन व तत्सम उपकरणांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे.



जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून हा आदेश लागू केला आहे. या आदेशानुसार, रायगड जिल्ह्यातील महत्त्वाच्या ठिकाणी तसेच आजूबाजूच्या परिसरात ड्रोन, रिमोट कंट्रोल मायक्रो लाईट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडिंग, पॅरामोटर्स, हँग ग्लायडर्स आणि हॉट एअर बलून यांच्या उड्डाणास सक्त मनाई करण्यात आली आहे.

> **जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून हा आदेश लागू केला आहे.**

हा आदेश पोलीस अधीक्षक, रायगड यांच्या शिफारशीनुसार आणि कायदा व सुव्यवस्थेच्या हिताच्या दृष्टीने घेण्यात आला आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २२३ अंतर्गत कठोर कारवाई केली जाणार आहे.

नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले असून, कोणतीही शंका असल्यास संबंधित पोलिस ठाण्यात संपर्क साधावा.

# शहापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा 'आंबा महोत्सव'
## नैसर्गिकरित्या पिकवलेल्या आंबा खरेदीची पर्वणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर** : शहापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने आंबा महोत्सवाचे आयोजन केले असून या महोत्सवात ग्राहकांना नैसर्गिकरित्या पिकवलेल्या आंबा खरेदीची पर्वणी लाभणार असल्याची माहिती सभापती नंदकुमार डोहळे यांनी प्रस्तुत प्रतिनिधिशी बोलतांना दिली.



शहापूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे १८ ते २१ मे दरम्यान असे चार दिवस आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.ज्या शेतकऱ्यांना आंबा विक्री करिता स्टॉलबाबत शहापूर कृषी उत्पन्न बाजार समितीकडे नाव नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले होते.दरम्यान स्थानिक शेतकऱ्यांनी आपल्या शेत-माळावर मोठ्या प्रमाणात आंबा लागवड केली आहे. शेतकऱ्यांच्या आंब्याला चांगला भाव मिळावा,दलालीत होणारी आर्थिक, मानसिक लुटीला पायबंद बसावा, बाजारात हापूसच्या नावे विक्री होणाऱ्या डुप्लिकेट हापूस विक्रीला आळा बसावा,ग्राहकांना ओरीजनल हापूस व केसरची ओळख व्हावी असे अनेक उद्देश डोळयासमोर ठेऊन कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतक-यांना मार्केटची संधी उपलब्ध करुन दिली आहे.

> **आंबा उत्पादकांना त्यांच्या हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणे, ग्राहकांना किफायतशीर दरात व गुणवत्तापूर्ण आंबे मनाप्रमाणे खरेदी करता यावेत,उत्पादक व ग्राहक यांचे संबंध दृढ व्हावेत तसेच शहापूरचा आंबा जगभरात जावा असे उद्धीष्ट डोळ्यासमोर ठेऊन आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.**
> **- नंदकुमार डोहळे, सभापती-कृषी उत्पन्न बाजार समिती,शहापर.**

# भिवंडी महानगरपालिका प्रशासन आगामी बकरी ईदसाठी सज्ज : देविदास पवार, प्रभारी आयुक्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : येत्या ०७ जून २०२५ ते ०९ जून २०२५ या कालावधीत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात बकरी ईद सण साजरा होणार असुन मा . उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्देर्शीत केलेल्या कार्यप्रणालीनुसार महानगर पालिका प्रशासनाने सर्वधर्मसमभाव या तत्वाने कार्यवाही करावी व शहरातील सामाजिक धार्मिक सौहार्दपुर्ण वातावरणात बकरी ईद सण पार पाडावा, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांना नेमून दिलेले कर्तव्य नियोजनबद्ध पार पाडावे आणि मा . उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने शहरातील नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिका प्रभारी आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त श्री . देविदास पवार यांनी केले आहे . बकरी ईद २०२५ च्या अनुषंगाने आज महानगरपालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत सर्व विभागांचा आढावा घेण्यात आला . यावेळी महानगरपालिका उपायुक्त बाळकृष्ण क्षीरसागर व उपायुक्त विक्रम दराडे यांसह महानगर पालिकेचे अन्य वरिष्ठ अधिकारी व विभाग प्रमुख उपस्थित होते .



### जीवनदीप महाविद्यालय गोवेली व खर्डी येथे
# बीएएमएमसी पत्रकारिता पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरु



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली/खर्डी** : बारावी नंतर विद्यार्थ्यांना पत्रकारिता आणि माध्यम क्षेत्रात कौशल्यपूर्ण करिअर घडवण्यासाठी मुंबई विद्यापीठ संलग्नित व नॅक मूल्यांकन प्राप्त जीवनदीप महाविद्यालय गोवेली व खर्डी येथे बीएएमएमसी हा पत्रकारिता पदवी अभ्यासक्रम संस्थेचे अध्यक्ष श्री रविंद्र घोडविंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून आहे. बारावीचा रिझल्ट लागताच बीएएमएमसी पत्रकारिता पदवीचे प्रवेश सुरु झाले आहेत. तरी जागा मर्यादीत असल्याने विद्यार्थ्यांनी तातडीने प्रवेश घ्यावेत.

पत्रकारितेच्या क्षेत्रात व्यावसायिक शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जीवनदीप महाविद्यालय गोवेली व खर्डी ने एक सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली आहे. मुंबई विद्यापीठ अंतर्गत मल्टिमीडिया अँड मास कम्युनिकेशन(बीएएमएमसी) या तीन वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२५~२६ करिता थेट प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. (बीएएमएमसी)या अभ्यासक्रमासाठी कोणत्याही शाखेतून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर थेट प्रवेश मिळणार आहे. हा पदवी अभ्यासक्रम स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही उपयुक्त आहे. या अभ्यासक्रमासाठी अनुभवी प्राध्यापक वर्ग, अत्याधुनिक स्टुडिओ, मीडिया लॅब तसेच प्रात्यक्षिक शिक्षण व इंटरशिपवर विशेष भर देण्यात येतो. शॉर्टफिल्म, डॉक्युमेंटरी प्रॉडक्शन, फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी, अँकरिंग यासारख्या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न विभागाकडून केला जात आहे. महाविद्यालयाकडे स्वतःचे दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता हे वृत्तपत्र असून, स्वतंत्र संगणक लॅब आणि प्लेसमेंट सुविधा सुद्धा पुरवण्यात येतात. त्यामुळे हा अभ्यासक्रम केवळ सैद्धांतिक नव्हे, तर व्यावहारिक ज्ञानही पुरवणारा ठरत आहे. या अभ्यासक्रमासाठी भारत सरकारची शिष्यवृत्ती देखील उपलब्ध आहे (बीएएमएमसी) पत्रकारिता पदवी अभ्यासक्रमामुळे आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी यशस्वी करिअर घडवले असून, टी.व्ही. चॅनल्स, वृत्तपत्र, आकाशवाणी, एफ.एम. रेडिओ, वेब मीडिया, रेडिओ जॉकी, जनसंपर्क अधिकारी, संवाददाता, उपसंपादक, निवेदक, रिपोर्टर, युट्युबर, सोशल मीडिया मॅनेजर, डिजिटल मीडिया मॅनेजर अशा विविध माध्यम क्षेत्रांमध्ये विद्यार्थी कार्यरत आहेत. तरी बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींनी या अभ्यासक्रमासाठी अवश्य प्रवेश घ्यावा आणि सामाजिक क्षेत्रातील उज्ज्वल करिअरसाठी आतापासूनच तयारी सुरू करावी. सर्जनशीलता, अभ्यासूपणा व सामाजिक भान असणाऱ्या विद्यार्थिनींसाठी ही सुवर्णसंधी आहे. तरी या अभ्यासक्रम प्रवेशाच्या अधिक माहितीसाठी डॉ.राहुल तौर विभाग प्रमुख ९४२१०५९३९६ यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन गोवेली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.बी कोरे, डॉ .अशोक वाघ आणि खर्डी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य कैलास कळकटे यांनी केले आहे.

> **बारावी नंतर पत्रकारिता आणि माध्यम क्षेत्रात कौशल्यपूर्ण करिअरची संधी**

### विद्यार्थ्यांना'येथे'नोकरीची संधी

या पत्रकारिता पदवी अभ्यासक्रमामुळे टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, आकाशवाणी, एफ.एम. रेडिओ, वेब मीडिया, रेडिओ जॉकी, जनसंपर्क अधिकारी, संवाददाता, उपसंपादक, निवेदक, रिपोर्टर, यूट्यूबर, सोशल मीडिया मॅनेजर, डिजिटल मीडिया मॅनेजर अशा विविध क्षेत्रांमध्ये नोकरीच्या संधी आहेत.

# डोंबिवलीत पायी तिरंगा यात्रा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने राबवलेल्या'ऑपरेशन सिंदूर मुळे दहशतवादाचे कंबरडे मोडण्याचे काम भारतीय लष्कराने केले आहे. या महान कामगिरीबद्दल आपल्या भारतीय लष्कराचे मनापासून आभार व्यक्त करणे, त्यांचा सन्मान करणे,आणि जवानांचे मनोबल वाढविण्यासाठी पायी तिरंगा यात्रेचे आयोजन केले आहे.

सदर तिरंगा यात्रेला दिनांक १८ मे रोजी सकाळी ९:३० वाजता प्रारंभ होणार आहे. श्री गणेश मंदिर संस्थान, आप्पा दातार चौक, फडके रोड, डोंबिवली पूर्व येथून होणार आहे तर्व तिरंगा यात्रेचा समारोप कॅप्टन विनयकुमार सच्चान स्मृतीस्थळ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डोंबिवली पूर्व येथे होईल.

रॅलीचा मार्ग : गणपती मंदिर, इंदिरा गांधी चौक, पी पी चेंबर्स, सर्वेश हॉल, टिळक चौक, शेलार चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक

सदर तिरंगा यात्रेत सर्व लोकप्रतिनिधी, शिवसेना पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना, अंगीकृत संघटना, सर्व राष्ट्रप्रेमी नागरिक यांनी बहुसंख्येने रॅलीत सहभागी होतील अशी माहिती आमदार राजेश मोरे यांनी दिली.

# अल्पवयीन मुलावर लैंगिक अत्याचार

**उल्हासनगर:** उल्हासनगर मध्यवर्ती पोलीस ठाणे अंतर्गत एका अल्पवयीन मुलावर शौचालयात नेहून लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकारणी मध्यवर्ती पोलिसांनी काही तासात नराधम आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. पिडीत मुलगा हा गुरुवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास सार्वजनिक शौचालयात गेला असता त्याठिकाणी आरोपी अमित कोतपिल्ले याने त्या मुलाला धमकी देत त्याच्यावर लैंगिक अत्याचार केले, रक्ताच्या थारोळयात माकलेल्या पिढीत मुलाची आई-वडिलांनी विचारपूस केली असता त्याच्या सोबत लैंगिक अत्याचार झाल्याचे उघड झाले, पिढीत मुलाच्या आईवडिलांनी तात्काळ मध्यवर्ती पोलीस ठाणे गाठून आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला. आरोपी हा काही दिवसांपूर्वी कारागृहातून जामिनावर सुटून आला होता, यापूर्वी देखील त्याच्यावर विविध पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. आज त्याला कल्याण येथील न्यायालयात हजर करण्यात आले.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

# शहापुर तालुक्यातील इको सेन्सेटिव्ह झोन विरोधात बाधित ग्रापचे अंतर १०० मीटर करण्यासाठी ग्रामसभेत ठराव

## केंद्राकडे सकारात्मक अहवाल पाठवण्याची बाधित शेतकऱ्यांची मागणी




**इको सेन्सेटिव्ह झोन विरोधात शहापुर तालुक्यातील शेतकऱ्यांनी लोकहित फाउंडेशनच्या वतीने इकोसेन्सटिव्ह झोनचे अंतर १०० मीटर करण्यात यावे अशी मागणी बाधित शेतकऱ्यांच्या वतीने शहापुरच्या उपवनसंरक्षक यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे तर तालुक्यातील उंबरखांड, लाहे, कळमगाव,आटगाव,आवरे-पुणध, सावरोली व आसनगाव यांच्याकडून इको सेन्सेटिव्ह झोनचे अंतर १०० मीटर करण्याचा ग्राम सभेचा ठराव देण्यात आला आहे.**

**'शहापूरातील इकोसेन्सेटिव्ह झोनचे अंतर १००मीटर करण्यात यावे व त्यासाठी वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देऊन केंद्राकडे शेतकऱ्यांसाठी सकारात्मक अहवाल पाठवावा.'**
**- ऍड,.निखिल खाडे /विठ्ठल भोईर,लोकहित फौंडेशन.**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** शहापूर तालुक्यातील तानसा अभयारण्यालगत जमीन असणाऱ्या व इको सेन्सेटिव्ह झोन संदर्भात हरकत घेतलेल्या शेतकऱ्यांनी 9 मे 2025 रोजी वनविभागाकडे इकोसेन्सेटिव्ह झोनचे अंतर 100 मीटर करण्यात यावे अशी मागणी करून तसा लेखी जबाबही वनविभागाला दिला आहे तसेच तालुक्यातील बाधित ग्रापनेही ग्रामसभेत 100 मीटर अंतरावर इको सेन्सेटिव्ह झोन ठेवण्यासाठी ठराव घेऊन वनविभागाकडे दिले आहेत. केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या 7 मे 2024 च्या अधिसूचनेनुसार तानसा अभयारण्य लगत 9 किमी पर्यंत इकोसेन्सिटिव्ह झोन लागू होणार आहे. सदर इको सेन्सिटिव्ह झोन अस्तित्वात आल्यास शेतकरी, व्यावसायिक, कारखानदार व कामगार देशोधडीला लागणार आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांनी इको सेन्सेटिव्ह झोनचे अंतर 100 मी करण्याची मागणी केली आहे.

बाधित शेतकऱ्यांच्या जमिनीत वीटभट्टी, विहीर, बोअरवेल, बांधकाम, खाणकाम, स्टोन क्रशर, गृह प्रकल्प, औद्योगीकरण, कारखाने, लघुउद्योग, शेती, शेतीपूरक व्यवसाय व कुक्कुटपालन यावर पूर्णतः बंदी करण्यात येणार आहे. इको सेन्सिटिव्हमुळे गृहप्रकल्प व उद्योगधंदे पूर्णतः बंद होणार असल्यामुळे जमिनीचे मूल्य प्रचंड घसरेल व विकास कामे नसल्यामुळे बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. शहापूर तालुक्यातील तानसा अभयारण्यापासून 1 ते 9 किलोमीटर पर्यंतचा परिसर एकोसेन्सेटिव्ह करण्याच्या केंद्र सरकारच्या प्रस्तावाला शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी तिव्र विरोध केला असून हे अंतर 100 मीटर करावे अशी एकमुखी मागणी बाधित शेतकऱ्यांनी केली आहे.

शहापूर तालुक्यात इकोसेन्सेटिव्ह होणार असल्याच्या जमिनीवर सद्या विकसित असलेले औद्योगिक क्षेत्र, तसेच मुंबई नाशिक महामार्ग लगतचे हॉटेल, व्यवसाय निवासी संकुले अस्थितवात असल्याने येथील रहिवाशी, व्यापारी व शेतकरी यांचे जीवनच संपुष्टात येणार आहे व तानसा अभयारण्याच्या इको सेन्सिटिव्ह झोनची वाढ करण्याचा निर्णय हा शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक व घाई घाईने घेतलेला आहे शासनाच्या या अन्यायकारक निर्णय विरोधात शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांसहित व्यापारी व कारखानदारांनी या निर्णयाविरोधात तक्रारी अर्ज करून वनविभागाकडे हरकती घेतलेल्या आहेत व यावर शेतकऱ्यांनी वनविभागाला लेखी जबाब देऊन विरोध केला आहे.

# गांधीजींचे असहकार आंदोलन : सहा वर्षे तुरुंगवास



भारताच्या स्वातंत्र्यात महात्मा गांधी यांचे योगदान खूप मोठे आहे. त्यामुळे त्यांना देशाचे राष्ट्रपिता मानले जाते. इतिहासात असे अनेक प्रसंग आले जेव्हा गांधीजींनी आपले कणखर चारित्र्य सिद्ध केलं. आजपासून शंभर वर्षांपूर्वी गांधीजींसाठी असाच कसोटीचा दिवस होता. त्यांनी असहकार आंदोलन बंद केलं होतं. देशातील तरुणाई त्यांच्यावर नाराज होती. जनतेत संताप आणि निराशा होती. त्यामुळे इंग्रजांमध्येही त्यांची भीती कमी झाली आणि त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला. 18 मार्च 1922 या दिवशी त्यांना 6 वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षाही झाली होती. रौलेट कायद्याच्या विरोधात आंदोलन 1919 मध्ये रौलेट कायद्याच्या विरोधात देशातील लोक ब्रिटिशांच्या विरोधात एकजूट होऊ लागले. 19 एप्रिल रोजी जालियनवाला बाग हत्याकांडाने या निषेधाच्या आगीत आणखीच भर पडली. संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाचे वातावरण निर्माण झाले. हे लक्षात घेऊन गांधीजी आणि काँग्रेसने देशात असहकार आंदोलन सुरू केले, ज्याला संपूर्ण देशातील प्रत्येक घटकाचे सहकार्य मिळाले.असहकारासाठी अभूतपूर्व सहकार्य अशा आंदोलनाची आजच्या काळात केवळ कल्पनाच करता येईल. ज्या काळात सोशल मीडिया सोडा, टेलिफोनही आवाक्याबाहेर होता. गांधीजींच्या आंदोलनाला सर्वांनी पाठिंबा दिला. विद्यार्थी, गरीब, मजूर, शेतकरी, अगदी सरकारी कर्मचारीही आंदोलनात सहभागी झाले होते. अशा स्थितीत ब्रिटिश राजवटीला मोठा धक्का बसला. एका घटनेने सर्व काही बदलले फेब्रुवारी 1922 मध्ये उत्तर प्रदेशातील चौरी चौरा येथे निदर्शनादरम्यान शेतकऱ्यांच्या एका गटाने पोलिस स्टेशन जाळले. यामध्ये अनेक पोलीस कर्मचारी मारले गेले. या घटनेने गांधीजी खूप निराश झाले आणि त्यांनी आंदोलन संपवण्याची घोषणाही केली. कोणत्याही आंदोलनाच्या यशाचा पाया हिंसेवर घातला जाऊ शकत नाही, असे मत त्यांनी मांडले. हा खूप मोठा पण कठीण निर्णय होता. एक धोकादायक निर्णय असहकार आंदोलन संपल्याने देशातील अनेकांची निराशा झाली. याची जाणीव असतानाही गांधीजींनी एवढा मोठा निर्णय घेतला. ज्याची आजच्या युगात कल्पनाही करता येणार नाही. एक प्रकारे गांधींची राजकीय कारकीर्दच पणाला लागली होती. तरुणांमध्ये नाराजी पसरली होती. अनेक लोक हिंसक क्रांतिकारी मार्गाकडे वळले. काँग्रेसमध्येही अनेक नेते गांधीजींबद्दल निराश झाले होते. उघडपणे त्यांच्या विरोधात जाण्याचे धाडस कोणी केले नाही, पण नंतर ते स्वतःचा वेगळा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून आले. इंग्रजांनाही संधी मिळाली गांधीजींना असहकार आंदोलनात मिळालेल्या यशाने इंग्रजही घाबरले होते. त्यांच्यावर कोणतेतरी आरोप करून त्यांला अटक केली तर भारत त्यांना गमवावा लागू शकतो, अशी भिती त्यांना होती. मात्र, चळवळ रद्द झाल्यानंतर, गांधींबद्दल लोकांची निराशा वाढली आणि 10 मार्च 1922 रोजी गांधींना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली.सहा वर्षे तुरुंगवास यंग इंडियामध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या तीन लेखांचा आधार घेऊन इंग्रजांनी गांधींवर देशद्रोहाचा आरोप लावला होता. 18 मार्च 1922 रोजी, न्यायाधीश ब्रूम फील्ड, जे त्यांच्या खटल्याची सुनावणी करत होते, त्यांनी गांधींना देशद्रोहाच्या गुन्ह्यासाठी 6 वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. गांधीजींना पूर्ण जाणीव होती की आपल्यासोबत असे होऊ शकते, मग त्यांनी आंदोलन मागे घेण्याच्या निर्णयाला नेहमीच समर्थन दिले आणि अहिंसेच्या आपल्या युक्तिवादावर ठाम राहिले. दोन वर्षे तुरुंगात राहिल्याने गांधीजींची तब्येत बिघडू लागली आणि इंग्रजांना त्यांची सुटका करावी लागली. या काळात गांधीजींनी जो संयम आणि दूरदृष्टी दाखवली त्यामुळे त्यांच्या तत्त्वांना चिकटून राहण्याची त्यांची क्षमता दिसून आली. ते आजच्या युगात दिसत नाही. अर्थात, त्या वेळी लोकांमध्ये गांधींविरोधात निराशा आणि चीड देखील होती. परंतु, हे सर्व लवकरच नाहीसे झाले आणि गांधीजींनी काही वर्षांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली, ज्यामुळे इंग्रजांना दोन पावलं माघार घ्यावी लागली. जे त्यावेळी देशासाठी पुरेसे नव्हते, पण भारतीय स्वातंत्र्य चळवळ आकार घेऊ लागली होती.

# रायगड जिल्ह्यात १८ मे पर्यंत यलो अलर्ट

**नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** प्रादेशिक हवामान विभाग, मुंबई यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार जिल्ह्यात 15 मे 18 मे 2025 या कालावधीत यलो अलर्ट देण्यात आलेला आहे. जिल्ह्यात गडगडाट होवून हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची, वीज चमकण्याची व ताशी 40 ते 50 किमी प्रती तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. हवामानाची माहिती भारतीय हवामान खात्याच्या https://mausam.imd.gov.in// या संकेतस्थळावरून घ्या. कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नका व अफवा पसरवू नका. कुठल्याही मिळालेल्या बातमीची खात्री अधिकृत सूत्रांकडून करून घ्या किंवा जिल्हा नियंत्रण कक्ष 8275152363, (02141) 222118 किंवा टोल फ्री क्रमांक 1077 वर संपर्क करा. हवामान विभागाकडून दिलेल्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आपल्या जीवित व मालमत्तेची काळजी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संदेश शिर्के यांनी केले आहे.* 15 ते 18 मे या कालावधीत नागरिकांनी पुढीलप्रमाणे दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणा मार्फत करण्यात येत आहे.

वीज चमकत असताना विजा चमकत असताना संगणक, टीव्ही इत्यादी विद्युत उपकरणे बंद ठेवून स्त्रोतांपासून अलग करून ठेवावीत. दूरध्वनी, भ्रमणध्वनी चा वापर टाळावा. वीज चमकत असताना नागरिकांनी घराबाहेर पडू नये. घराबाहेर असल्यास सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. विजेच्या खांबांपासून लांब रहावे. वीज चमकत असताना उंच झाडाखाली आश्रयास थांबू नये. वीज चमकत असताना एखाद्या मोकळ्या परिसरात असल्यास, गुडघ्यामध्ये डोके घालून वाकून बसावे. धातूच्या वस्तू दूर ठेवाव्यात. वीज पडण्याची पूर्वसूचना मिळण्याकरिता आपल्या मोबाईल वर 'दामिनी ॲप' डाऊनलोड करून घ्यावे. पाऊस पडत असताना वीज चमकत असल्यास नागरिकांनी झाडाखाली उभे राहू नये. मोबाईलवर संभाषण करु नये आणि इलेक्ट्रिक वस्तूंपासून दूर रहावे. अशा परिस्थितीत पक्के घर किंवा इमारतीत आसरा घ्यावा.

## बालरंगभूमी परिषद कल्याण शाखेच्या वतीने
# शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** भारत-पाकिस्तान तणावपूर्ण युद्धविरामानंतर राणी लक्ष्मीबाई उद्यान कल्याण पश्चिम येथे २१ ऑगस्ट २००६ साली जम्मू-काश्मीर येथे कर्तव्य बजावत असताना वीरगती प्राप्त झालेले कल्याणचे भारतीय सैन्यदलाचे जिगरबाज शहीद जवान निलेश मधुकर संगपाळ यांच्या स्मारकाजवळ युद्धात वीरगती प्राप्त झालेल्या सर्व शहीद भारतीय जवानांना बालरंगभूमी परिषद कल्याण शाखा यांच्या वतीने पुष्पचक्र व पुष्प वाहून शौर्यपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी बाल कलावंत, विद्यार्थी, पालक, शिक्षक, रंगकर्मी कल्याण शहरातील ज्येष्ठ नागरिक तसेच अनेक सिने-नाट्य कलावंत आणि बालरंभूमी परिषद कल्याण शाखेचे कार्यकारिणी व सर्व सभासद- सदस्य मोठ्याप्रमाणात आवर्जून उपस्थित होते. यावेळी बालरंगभूमी परिषद कल्याण शाखेचे प्रमुख कार्यवाह शिवाजी शिंदे यांनी शहीद जवान निलेश संगपाळ यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या देशसेवेला सलाम करत सर्व वीरगती प्राप्त झालेल्या शहीद भारतीय जवानांना जड अंतःकरणाने भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

बालरंगभूमी परिषद कल्याण शाखेच्या अध्यक्षा सुजाता डांगे यांनी शहीद निलेश संगपाळ यांच्या वीर माता मालती संगपाळ व त्यांच्या वीरपत्नी कल्याणी संगपाळ यांना पुष्पगुच्छ व शाल देऊन सन्मानित करून त्यांच्या वीर पुत्राला व त्यांच्या देश सेवेला सलाम करत आशीर्वाद घेतले. यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, बालरंगभूमी परिषद, जेष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते. कार्यक्रम प्रसंगी अभिनेते-गायक रमेश जाधव, जे.पी. सिंग व त्यांच्या संपूर्ण समूहाने देशभक्तीपर गीते सादर करून सर्व शहीद जवानांना मानवंदना दिली.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# लालचौकी स्मशानभूमीत बर्निंग स्टॅन्डवर पावसाळी शेड न उभारल्यास उपोषणाचा इशारा

## सामाजिक कार्यकर्ते बाबा रामटेके यांचे केडीएमसी आयुक्त आणि पोलीस उपायुक्तांना पत्र

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील लाल चौकी स्मशान भूमीत तात्काळ चार बर्निंग स्टॅन्ड तयार करून त्यावर पावसाळी शेड उभारावे. चार दिवसात हे काम सुरु न केल्यास केडीएमसी आयुक्तांच्या बिल्डिंग खाली उपोषण करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते बाबा रामटेके यांनी केडीएमसी आयुक्त आणि पोलीस उपायुक्तांना दिला आहे.

शुक्रवारी केडीएमसी विरोधी पक्ष नेते दिवंगत दिनेश तावडे यांचे निधन झाले. त्यांचे पार्थिवदेह लालचौकी स्मशान भूमी येथे नेण्यात आले होते. या प्रसंगी माजी मंत्री खासदार जगन्नाथ पाटील, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार संजय केळकर, माजी आमदार नरेंद्र पवार, प्रकाश भोईर व अनेक मान्यवर पत्रकार उपस्थित होते. त्याच वेळी थोडा थोडा पाऊस सुरु झाला. सर्वांनी स्मशानाची असुविधा पाहून नापसंती व्यक्त केली. जोरात पाऊस सुरु झाला असता तर पार्थिव देह जाळने मुश्किल झाले असते कारण स्मशान भूमीचे काम सुरु असल्याने तात्पुरते जाळण्याचे दोनच स्टॅन्ड केलेले आहेत त्यावर कोणतेही पावसाळी शेड उभे केलेले नाहीत.

दिवंगत दिनेश तावडे यांचे पार्थिव स्मशानात आणले गेले तेंव्हा प्रचंड गर्दी झालेली होती. आणि त्याच वेळी पत्रकार सचिन सागरे यांच्या वडिलांचे पार्थिवदेह स्मशानाच्या गेट वर आले. दोन जाळयान्याचे स्टॅन्ड जवळ जवळ असल्याने व गर्दी असल्याने जवळ जवळ एक तास सचिन सागरे यांच्या वडिलांचे पार्थिव देह ठेवलेली गाडी बाहेर उभी ठेवावी लागली. या बाबत अनेक पत्रकारांनी खेद व्यक्त केला.



विशेष म्हणजे या प्रसंगाच्या एक दिवस अगोदरच १५ तारखेला याच स्मशान भूमीच्या गैरसोई बाबत सर्व वर्तमान पत्रात बातम्या छापून आलेल्या आहेत. याची दखल महापालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने घेतली नाही. कार्यकारी अभियंता जगदीश कोरे, शहर अभियंता अनिता परदेशी, अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांच्या पर्यन्त या बातम्या पोहचल्या नाहीत का..? गेले साधारण वर्षभर या स्मशान भूमीचे धिम्या गतीने काम सुरु आहे. कोणीही लक्ष द्यायला तयार नाही.

त्यामुळे लालचौकी स्मशान भूमीत तात्काळ चार जाळण्याचे स्टॅन्ड तयार करण्यात यावे. जाळण्याच्या स्टॅन्ड वर पावसाळी शेड उभे करण्यात यावे. सुक्या लाकडांची चार महिने पावसाळयात पुरतील अशी सोय करण्यात यावी. स्मशान भूमीच्या कामाचा वेग वाढवावा. काम केव्हा सुरु केले व केव्हा पूर्ण करणार याच्या मुदतीचा, ठेकेदाराचा नावासह, कार्यकारी अभियंता यांचे नाव मोबाईल नंबर सह फलक (बोर्ड) लावण्यात यावा. २० मे पर्यन्त या बाबत कोणतीही कामाची सुरवात न झाल्यास केडीएमसी आयुक्तांच्या इमारती खाली उपोषण सुरु करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते बाबा रामटेके यांनी दिला आहे.

# ह.भ.प.नामदेव महाराज हरड यांना जीवे मारण्याची धमकी

## आपला संतोष देशमुख होण्याची हरड यांना भिती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** मुरबाड तालुक्यातील नागाव येथील रहिवासी आंतरराष्ट्रीय विश्व हिंदू-सिख्ख महापरिषद उपाध्यक्ष तथा काशी विद्वत परिषद प्रभारी विश्वगुरु सन्मानित ह.भ.प.नामदेव महाराज हरड यांना जीवे मारण्याच्या वारंवार धमक्या काही जण देत असुन दुसऱ्याच्या मालमत्ता हडप करण्याच्या उद्देशाने वारंवार जीवे मारण्याच्या धमकी देत असल्याचा तक्रार अर्ज नामदेव महाराज हरड यांनी मुरबाड पोलीस स्टेशन येथे दिला असून पोलीसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे.

हरड यांच्या मालकी हक्काची कब्जा वहिवाटीस असलेली जमीन सातबारा त्यांच्या नावे असलेली जमीन जमीन गट क्रं ७ क्षेत्र ३५ आर असुन या जमीनीवर नव्याने घराची दुरुस्ती करण्यासाठी नविन सिमेंटचे पत्रे व नविन लोखंडी पाईप व कटींग मिशन द्वारा वेल्डिंग व कटिंग कायम पक्के काम करत आहे. याबाबत त्यांनी ग्रामपंचायत अधिकारी ग्रामसेवक लेखी अर्ज दाखल केला असता तात्काळ पाहाणी करुन वस्तुस्थिती पहाण्यासाठी ग्रामसेवक आले असता सामनेवाले घरात लपून बसले होते. सरकारी अधिकारी हाका मारत होते परंतु आतुन प्रतिसाद मिळाला नाही म्हणून ते निघून गेले. यानंतर लगेच संबंधितांनी नामदेव हरड यांना शिवी



गाळी करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

कामांचे स्वरूप पहाता हरड यांनी अनाधिकृत बांधकाम करत असल्याचे ग्रामसेवक नागाव यांच्या निदर्शनासा लेखी निवेदन दिले आहे तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती समिती मुरबाड यांना व मुरबाड पोलिस स्टेशन अंतर्गत ही लेखी निवेदन दिले आहे. सामनेवाले गुन्हेगिरी प्रवृत्तीचे असुन हे गावगुंड प्रवृत्तीचे असुन उद्या हे संतोष देशमुख सारखी अवस्था माझी देखील करू शकतात अशी भीती नामदेव हरड यांनी व्यक्त केली आहे. याबाबत त्यांनी मुरबाड पोलिस स्टेशन अंतर्गत तक्रार अर्ज करत पोलीसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला असुन सामनेवाले यांनी या घराचे काम त्वरित थांबवले पाहिजे व जीवे ठार मारण्याची धमकी देणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी हरड यांनी केली आहे. कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.





# फरार आरोपीला पोलीस ठाण्याच्या आवारात अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर:** उल्हासनगरमधील गुन्हेगारांचे मनोबल इतके वाढले आहे की गुन्हेगारांना पोलिसांची भीतीच उरलेली नाही. याचे ताजे उदाहरण म्हणजे दोन वर्षांपासून हद्दपार असलेला गुन्हेगार साहिल राजू साबळे हा पोलीस ठाण्याच्या आवारात फिरताना आढळला असून हिल लाईन पोलिसांनी त्याला अटक केली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कैलाशनगर सोहम क्लासेसच्या शेजारी असलेल्या भाटिया चौक उल्हासनगर सिटी कॅम्प क्रमांक ४ मध्ये राहणारा साहिल राजू साबळे याच्या गुन्हेगारी रेकॉर्डमुळे, झोन ४ च्या पोलिस उपायुक्तांनी त्याला १ मार्च २०२४ रोजी ठाणे जिल्हा, मुंबई शहर, मुंबई उपनगरे, रायगड, कर्जत, पनवेल येथे दोन वर्षांसाठी हद्दपार केले होते. तडीपार असताना साहिल हा उल्हासनगरात बिंदास फिरत होता काल तर त्याने हद्दच केली तो चक्क १४ मे २०२५ रोजी पहाटे १.३० वाजता कोणत्याही सक्षम अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय हिल लाईन पोलीस ठाण्याच्या आवारात फिरत होता. पोलिस कॉन्स्टेबल नागनाथ यांना तो लक्षात येताच त्यांनी त्याला अटक केली. आरोपीविरुद्ध पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे.

## कल्याण रेल्वे स्थानकावरील

# तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेचे काम रखडल्याने प्रवाशांची गर्दी कायम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण:** मध्य रेल्वेचे प्रवेशद्वार आणि महत्त्वाचे जंक्शन असलेल्या कल्याण रेल्वे स्थानकातून दररोज चार लाख प्रवासी प्रवास करतात. दिवसागणिक वाढणाऱ्या प्रवाशांमुळे सर्वच लोकल खचाखच भरून धावत असल्याने, दरवाजात लटकून प्रवास करण्याची वेळ प्रवाशांवर येते. गर्दीमुळे लोकलमधून पडून प्रवाशांना हकनाक जीवाला मुकावे लागते. यामुळे लोकल फेऱ्या वाढविण्याची मागणी असताना, मागील १३ वर्षांत याकडे साफ दुर्लक्ष झाले आहे.

मध्य रेल्वेचे कल्याण स्थानक हे अत्यंत वर्दळीचे स्थानक आहे. येथून दररोज मुंबईच्या दिशेने २०५ फेऱ्या धावतात आणि तितक्याच लोकल मुंबईकडून कल्याणच्या दिशेने येतात. या लोकलमधून दररोज तीन लाख ७६ हजार प्रवासी प्रवास करतात. प्रवासी संख्या पाहता, लोकलची संख्या अतिशय अपुरी असल्याने प्रवाशाचे हाल होतात. मध्य रेल्वेवर वर्षभरात जवळपास ७०० ते ८०० प्रवाशांना जीव गमवावा लागत आहे. मात्र रेल्वेकडून लोकल वाढविणे शक्य नसल्याचे उत्तर दिले जात आहे.

रेल्वेकडून मध्य रेल्वेवर धावणाऱ्या लोकलपैकी नऊ गाड्या १५ डब्यांच्या आहेत. या मार्गावर दिवसभरात ८० वातानुकूलित फेऱ्या धावतात. रेल्वेच्या तिसऱ्या आणि चौथ्या



मार्गिकेचे काम पूर्ण झाल्यास, यावर उपाय करणे शक्य आहे. मात्र तिसरी व चौथी मार्गिका भूसंपादनामुळे रखडली आहे. प्रवाशांकडूनच रेल्वेला जागा देण्यास विरोध होत असेल, तर रेल्वेमार्गाचे विस्तारीकरण कसे करणार, असा प्रश्न रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे.

### वाढीव फेऱ्या तूर्त नाहीच

'सध्या लोकल फेऱ्या वाढविण्याचे कोणतेही नियोजन नाही. वाढत्या गर्दीवर पर्याय म्हणून कार्यालयीन वेळा काही प्रमाणात बदलल्या जाव्यात, त्यामुळे गर्दी विभागली जाईल,' असे रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला यांनी स्पष्ट केले आहे.

# मानिवली (बु) सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी चिंतामण वारघडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील मानिवली (बु) येथील सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदी चिंतामण वारघडे यांची बिनविरोध निवड झाली आहे तर , व्हाईस चेअरमन पदी भरत कराळे यांची सुद्धा बिनविरोध निवड झाली आहे.

निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले व शुभेच्छा देताना सुभाष पवार ठाणे जिल्हा माजी उपाध्यक्ष तथा संचालक ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ली.

समवेत संचालक शंकर गोंधळी, मधुकर गोल्हे, मनोहर पानसरे, रमेश गोंधळी, बुधाजी खुणे, विकास वारघडे, बाळु कराळे, रघुनाथ वारघडे उपस्थित होते. नवनिर्वाचित चेअरमन/व्हाईस चेअरमन यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# पेण येथे तलवार व दांडपट्टा प्रात्यक्षिके सादर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण:** पेण तालुक्यामध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आली.

छावा क्रांतिवीर सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या प्रयत्नाने आयोजित पेण तालुक्यामध्ये सलग चौथ्या वर्षी छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी झाली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमेस वंदन व पालखीचे पूजन करून महाराजांच्या चौकातून पालखी काढून भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करत पालखी नगरपालिकेच्या समोरून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौकामध्ये वारकरी संप्रदाय इचलगिरी संप्रदाय नित्य पाठण भजन मंडळ मोठे वढाव यांच्या वारकरी मंडळा सोबत धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक पेण येथे आदरपूर्वक प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रसंघ प्रस्तुत शिवकालीन लाठीकाठी तलवार दांडपट्टा चालविण्याचे प्रात्यक्षिक कार्यक्रम करण्यात आला सदर कार्यक्रम ऐतिहासिक पद्धतीने जुन्या चाली परंपरा जपत जतन करत पार पाडण्यात आले. सदर कार्यक्रमांमध्ये प्रमुख उपस्थित अखिल भारतीय छावा संघटना कोकण प्रदेश अध्यक्ष धनंजय घरत व स्वप्निल घरत, तसेच शिवतेज युवा फाउंडेशन अध्यक्ष हेमंत पाटील,सामाजिक कार्यकर्ते चैतन्य पाटील नांदाताई म्हात्रे, रायगड जिल्हा सल्लागार दिलीप साळवी , सचिव दीपक संसारे, सहसचिव राजेंद्र ठाकूर, पेण तालुका महिला आघाडी अश्विनी ठाकूर, पेण उपतालुका उपध्यक्ष संजय भोईर, उपशहर अध्यक्ष गिरीश म्हात्रे तालुका सल्लागार राम ठाकूर, बालकृष्ण ठाकूर, विनायक ठाकूर, गणेश म्हात्रे, विजय ठाकूर समाज सेवक उपस्थित होते छावा संघटना अध्यक्ष जितेंद्र ठाकूर यांनी आभार मानले

# आतंरराष्ट्रीय स्पर्धेसाठी रायगड मधील खेळाडूंची निवड




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** रायगड जिल्ह्यातील पेण येथील युनायटेड शोतोकान कराटे असोशिएशन मध्ये रविंद्र म्हात्रे ह्यांच्या कडे प्रशिक्षण घेत असलेले विद्यार्थी गौरव गोरखनाथ म्हात्रे, मोहीत परशुराम कोठेकर,रितुल रविंद्र म्हात्रे, रविना रविंद्र म्हात्रे ह्यांची निवड करण्यात आली आहे. ही टीम मर्दानी स्पोर्ट एशियनचे अध्यक्ष मंदार पनवेलकर तसेच मर्दानी स्पोर्टचे इंडिया सचिव संतोष खंदारे ह्यांच्या नेतृत्वाखाली भुटान येथे खेळणार आहे .ह्या सर्व निवड झालेल्या खेळाडुचे युनायटेड शोतोकान कराटे असोशिएशन तर्फे व मर्दानी स्पोर्ट तर्फे स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## पहिल्याच पावसात

# मुरबाड नगरपंचायतीच्या नालेसफाईचे तिन तेरा





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड:** मुरबाड शहरात काल झालेल्या मुसळधार पावसाने दाणादाण उडवली असून अनेक ठिकाणी गटारे तुंबल्यामुळे नागरिकांच्या घरात पाणी घुसल्याचे चित्र पाहायला मिळाले.

पावसाळया पुर्वी नगरपंचायत नाले सफाई तसेच गटारे सफाईची मोहीम हाती घेत असतात.त्यासाठी मोठा खर्चही केला जातो. मात्र बुधवारी

### घरात गटाराचे सांडपाणी घुसल्याने आंदोलनाचा इशारा!

दुपारी झालेल्या मुसळधार पावसाने प्रभाग क्रमांक 11 गणेशनगर येथिल शांतीसदन इमारतीत पाणी घुसले होते. गेले तीन वर्ष सतत या इमारतीत पाणी घुसत असल्याचे येथिल रहिवाशांचे म्हणने आहे तर प्रभाग क्रमांक 16 मधील आरती तेलवणे यांच्या घरासमोरील गटार तुंबुन सांडपाणी थेट त्यांच्या घरात घुसल्याने मोठ्या प्रमाणात सामानाचे नुकसान झाले आहे. या रहिवाशांना नगरपंचायतच्या निष्काळजीपणाचा नाहक फटका सोसावा लागला आहे.

आरती आशिष तेलवणे या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडीच्या शहराध्यक्ष असून येत्या दोन दिवसात नगरपंचायत ने उपाय योजना न केल्यास गटारातील पाण्यात उभे राहून आंदोलन करण्याचा ईशारा त्यांनी मुरबाड नगरपंचायत प्रशासनाला दिला आहे. दरम्यान मुरबाड शहरातील सर्व च प्रभागात ठेकेदारांनी केलेल्या चुकीच्या कामाचा फटका नागरिकांना होत असून नगरपंचायत प्रशासन फक्त ठेकेदारांचे हित जोपासत आहे का अशी चर्चा होत असून काही मोजके प्रभाग सोडल्यास बाकी नगरसेवक समस्या सोडविण्यास कुचकामी ठरत आहेत असा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# वाशी नाका सर्विस रोड मानवनिर्मित मृत्यूचा सापळा – अभिमन्यू म्हात्रे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई:** मुंबई गोवा महामार्गावरील वाशिनाका येथे उड्डाण पूल होत नाही,की जाणूनबुजून करत नाही हा गर्भित प्रश्न आहे.जर उड्डाण पूल समजा झालाच तर थाटलेल्या दुकानाचे,हॉटेल यांचे काय? हा अनुत्तरीत प्रश्न आहे..म्हणून त्याला पर्याय रामवाडी ते वाशी नाका. काँक्रिट पर्यायी मार्ग शोधला..आणि तो पूर्णत्वास जाण्या अगोदर माशी शिंकली आणि तेथे २० ते २५ मीटर रस्ता अपूर्ण ठेवला. कित्तेक दिवस वाट पाहतात नागरिक पण तो रस्ता अपूर्ण आहे हे किती धोकादायक ठरू शकतो यासाठी आमची तरुणाई सतत प्रयत्न करून प्रशासनाच्या निदर्शनास आणून देतात,पैकी अभिमन्यू म्हात्रे यांनी परवाच याचे वास्तव समोर आणले.. खरोखर हा मृत्यूचा सापळा आहे...जर का पावसा अगोदर हे काँक्रीटीकरण झाले नाही तर पावसाळयात चिखल,मातीने रस्त्याची दुरावस्था होईल,रात्री अपघात होतील ते नक्कीच असे सामाजिक कार्यकर्ते अभिमान्यू म्हात्रे यांनी सांगितले.

मानवनिर्मित रस्त्यामुळेच मौल्यवान जीव जातील याला जबाबदार कोण? म्हणून हे काम महत्वाचे आहे. सर्व पत्रकार बांधव याविषयी वारंवार आवाज उठवून ही बातमी देतात पण योग्य सोल्युशन निघत नाही...यासाठी लोकवर्गणी काढावी का असा सवाल दबक्या आवाजात येतो.जिते,हमरापूर येथील रोड झाले पण खारे पाट विभागात अशी अवस्था का? ना पाणी, ना वीज, ना सिंचनाचे कार्यारंभ, ना सेझ जमिनीचा तोडगा, अशे अनेक प्रश्न मानवनिर्मितच,प्रशासनाने त्वरित हा रस्ता पूर्ण करून मानवतेस जागावे. यासाठी खासदार सुनिल तटकरे खासदार धैर्यशील पाटील आमदार रविंद्र पाटील यांनी तातडीने लक्ष घालून हजारो नागरिकांचा हा प्रश्न तातडीने सोडवण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी खारेपाट जनतेच्या वतीने अभिमान्यू म्हात्रे यांनी केली आहे.

# गणेशपुरी येथील सत्संगमध्ये बहुसंख्य साधकांची उपस्थिती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**झिडके-अंबाडी:** गुरूदेव सिद्धपीठाचे स्वामी नित्यानंद परमहंस यांची 117 वी जयंती महोत्सव शुक्रवार दिनांक-16/05/2025 रोजी गुरूदेव सिद्धपीठ गणेशपुरी,साधकभवन येथे आयोजित करण्यात आला होता.यावेळेस सत्संगाचे आयोजन करण्यात आले होते,सदर कार्यक्रमात असंख्य स्वामी मुक्तानंद बाबांचे साधक/भक्तजन उपस्थितीत राहून,बाबांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

या सत्संग महोत्सवानिमित्त बाबांचे सन-1981 मध्ये तमाम भक्तजनांसाठी उपदेश केलेले प्रवचन हिंदी,इंग्रजी भाषेतील आपल्या "परमशिष्या गुरूमाई"यांच्यासह हे ध्वनीमुद्रित सादर करण्यात आले,त्यावेळेस उपस्थित भक्तजन मंत्रमुग्ध झाले



होते.अशाच प्रकारचे अध्यात्मिक उपक्रम गुरूदेव सिद्धपीठ या ठिकाणी राबविण्यात येतात,तेव्हा साधक/भक्तजन यांनी खासकरून प्रत्येक रविवारी सायंकाळी गुरूदेव सिद्धपीठ,साधक भवन येथे यावे असे विनम्र निवेदन सिद्धपीठाच्या वतीने यावेळेस उपस्थितीत साधक/भक्तजन यांना करण्यात आले.

"स्वामी मुक्तानंद" यांच्या प्रेरणेतून गुरूदेव सिद्धपीठ ही संस्था भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी या ग्रामीण भागात कार्यरत असून या संस्थेचा कल्याणदीप हा एक विभाग ग्रामीण भागातील खासकरून आदिवासी किंबहुना दुर्लक्षित जनसमुदायातील महिला,शेतमजूर,शेतकरीवर्ग व युवक-युवतींसाठी स्वावलंबी बनविण्याचे विविध उपक्रम राबविण्यात नेहमी सक्रीय असतात,तसेच वृक्षारोपण,आरोग्य,स्वयंरोजगार तसेच नैसर्गिक वनसंवर्धन,शैक्षणिक बाबतीत शालेय परिसरात सोयीसुविधा पुरविणे या अनेकविध बाबींवर लक्ष केंद्रित करून,आपल्या संस्थेच्या कार्याने गुरूदेव सिद्धपीठ या संस्थेबद्दल सर्वसामान्यांना आपुलकी आहे.केवळ "स्वामी मुक्तानंद" आणि "गुरूमाई" यांचे अध्यात्मिक विचारांचे केंद्र म्हणून या संस्थेकडे न पाहता सामाजिक जाणीव आणि मानवता धर्म या दृष्टीकोनातून सदर संस्था कार्यरत असल्यामुळेच संस्थेच्या विविध उपक्रमात स्थानिक नागरिक आवर्जुन उपस्थित राहतात.

# कल्याणकरांनी अनुभवला 'शून्य सावली दिवस'

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण:** सुभेदारवाडा कट्टा आणि आकाश मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने "शून्य सावली दिवस" या खगोलीय घटनेचे निरीक्षण करण्यासाठी कल्याणमधील सुभाष मैदान येथे शनिवारी दुपारी १२:३० च्या सुमारास एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आकाश मित्र मंडळाचे सदस्य आणि खगोल अभ्यासक विद्येश कुलकर्णी यांनी शून्य सावली दिवस म्हणजे काय, तो केव्हा येतो, का येतो, शून्य सावली क्षण केव्हा असतो, जगातील कुठल्या भागतून तो अनुभवता येतो याची माहिती सोप्या शब्दांत सांगितली.

त्याचबरोबर सूर्याची क्रांती, उत्तरायण - दक्षिणायन, कर्क वृत्त आणि मकर वृत्त, संपात दिन, सूर्याचा भासमान मार्ग म्हणजेच आयनिक वृत्त, वेलांतर अशा खगोलीय संकल्पना देखील समजावून सांगितल्या. सूर्य रोज दुपारी बारा वाजता आपल्या डोक्यावर येतो असं बोली भाषेत आपण म्हणत असलो तरी सूर्य डोक्यावर म्हणजेच "झेनिथ" वर येणे म्हणजे काय आणि ते केव्हा होऊ शकतं तसेच प्रत्येक गावी दुपारी बारा वाजता माध्यान्ह होत नसून ती रेखांशाप्रमाणे कशी बदलते याची माहिती दिल्यावर उपस्थितांना विज्ञानाची किमया जाणून घेता आली.

त्याचबरोबर उपस्थितांना वर्तुळात उभं करून सावली पाहणं तसेच काचेवर पाईप ठेवून त्याची सावली बरोबर त्याच्या खाली कशी पडते ते दाखवणं असे सोपे प्रयोग देखील करण्यात आले. शून्य सावली या अद्भुत क्षणाच्या निरीक्षणाचा लाभ विद्यार्थीनी, लहान मुलांनी



आणि नागरिकांनी घेतला. विद्यार्थ्यांनी कुतुहलात्मक प्रश्न विचारले त्यावर त्यांना समजेल, अशा सोप्या भाषेत उत्तरं देण्यात आली.

ज्येष्ठ खगोल अभ्यासक हेमंत मोने यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सुभेदारवाडा कट्टा आणि आकाश मित्र मंडळाचे संजय पांडे यांनी संस्थेच्या खगोलशास्त्रातील वाटचालीची उपस्थितांना माहिती दिली. या कार्यक्रमास सुभेदारदार वाडा कट्टा, आकाश मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांसह विद्यार्थी, खगोलप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# पुण्यात सकल मराठा वधू-वर मेळाव्याचे आयोजन

**पुणे :** सर्वांना एकाच छताखाली स्थळे मिळून वेळ आणि पैशाची बचत व्हावी ह्या हेतूने रविवार २५ मे रोजी सकल मराठा समाज वधू वर परिचय मेळाव्याचे पुणे येथे आयोजन करण्यात आले असून मराठा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रविवार दिनांक २५ मे रोजी पुणे येथील वेदसभा हॉल, विश्व हॉटेल समोर, सारसबागेजवळ, सदाशिव पेठ येथे दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत मराठा समाज वधू वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला असून आमदार शंकरभाऊ मांडेकर यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार असून शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार विजेते भिला पाटील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून सर्वश्री शांतारामदादा इंगवले, सत्यवान उभे, बाबासाहेब कंधारे, दत्ता उभे, महादेव कोंढरे, के बी चौधरी, मधुकर घारे , अविनाश पाटील, शंकर पाटील, मोतीलाल पाटील, सुनिताताई लेकावळे, प्रतिभाताई पाटील, अलकाताई ववले, शिवाजी उभे, अकुंश उभे, किसन शिंदे, निवृत्ती उभे, दत्तात्रय उभे, राहुल गोविलकर, इत्यादी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असून अधिक माहितीसाठी मेळाव्याचे आयोजक अनिल काकडे यांना 8104211818 किंवा 9324552963 ह्या भ्रमण ध्वनी वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024